Review Of Research
Vol. 3 | Issue.5 | Feb.2014
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.org

ORIGINAL ARTICLE

# " पेशवेकालीन स्त्रीया आणि गुन्हे "

**प्राचार्य डॉ. बी. व्ही. चौधरी,**

वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर, सोलापूर,

***प्रस्तावना–***

प्राचीन भारतीय गुन्ह्याचे स्वरूप आजही पेशवेकालीन गुन्ह्यांच्या स्वरूपात बरेच साम्य आहे. त्या काळी पुरूषांबरोबरच स्त्रीयांही गुन्हे करीत असत, त्यांना गोतसभा, राजा शिक्षा करीत असे.

त्या काळात शिव्या देण्यापासून तर खून करण्यापर्यंत अनेक गुन्हे घडत होते. या काळात स्त्रियांनी ठराविक साच्याचे गुन्हे केलेले आहेत.

**चोरीचा गुन्हा :–**

पुरूषांप्रमाणे स्त्रियांकडूनही चोरी सारखे गुन्हे घडत असत. 'एका हिंदू बाईने केलेली चोरी उघडकीस आली. या अपराधाबद्दल तिला १६ फटके मारण्याची शिक्षा देण्यात आली. चोरीचा ऐवज कोठे दडवून ठेवला आहे हे सांगेपर्यंत तिला दररोज १६ फटके मारण्यात येत असे'[१].

चोरी करणाऱ्या व्यक्तीस इतरही अनेक शिक्षा दिल्या जात असत. तो जर अट्टल गुन्हेगार असेल तर त्याला जबर शिक्षा दिली जात असे. काही वेळेस तर चोरीबाबत गावपाटलावर जबाबदारी सोपवून त्यांच्याकडून दंड वसूल केला जात असे. 'थोपणदास कळवणकर पुण्याहून तटू रूपये व हांडेभांडे घेवून काळवणास जात असता वाटेत नाणे मावळांत माऊ येथे वस्तीस राहिला. तेंव्हा रात्रीची कंठाळच चोरांनी नेली याची जोखीम गावच्या पाटलाला ठेवून त्याजकडून १० रूपये दंड घेण्यात आला'[२]. या ठिकाणी पाटलाला जबाबदार धरण्याचे कारण म्हणजे ज्या गावात असे गुन्हे घडत असत तेंव्हा तो गुन्हेगार त्या गावातला असे व तो गावातच सापडण्याची शक्यता असे. गावातील गुन्हेगाराचा शोध लावण्याचे काम गावपाटलाचे म्हणून त्याने आपल्या कामात कुचराई करू नये म्हणून पाटलाकडून असा दंड वसूल केला जात असे.

आणखी एक पेशवाईतील चोरीच्या गुन्ह्याबाबतचे वैशिष्ट्या म्हणजे नवऱ्याने चोरी केली तरी तिचे प्रायश्चित्त त्याच्या बायका-मुलांना मिळे. 'खंड्या बेरड चाकणकर चोऱ्या करीत होता, म्हणून त्याची माणसे कैद करून किल्ल्यात ठेवली'[३]. याचा अर्थ असा की, चोरी करणाऱ्याच्या कुटुंबाला कैद करून त्यांचे हाल केले तर चोरी करणारा इसम त्यांचे हाल थांबविण्यासाठी आपणहून शरण येईल.

'बाजी सोनार याने चोरी केली म्हणून त्याच्या बायकोस कैदेत ठेवले'[४]. चोरी करणाऱ्या इसमांच्या बायका-मुलांना चोरी करणाऱ्या गुन्ह्यात सामील असल्याचा संशय व्यक्त करून त्यांना शिक्षा दिली जात असे.

**लग्नकार्यातील फसवाफसवी व जातीबाह्या कर्म :–**

१८ व्या शतकातील समाज जीवनात जातीबाह्या कर्म करणाऱ्यांना व फसवणुकीचा गुन्हा करणाऱ्यांना कडक शासन करण्यात येत असे. असे गुन्हे जरी पुरूषांकडून घडत असले तरी त्यात स्त्रियांच भरडल्या जात होत्या असे दिसते. 'कनिष्ठ दर्जाचे मराठे वरिष्ठ किंबहुना अधिक कुलीन घराण्यातील मुलीशी केवळ पैशाच्या

किंवा सत्तेच्या जोरावर लग्ने करू पाहत. महादजी शिंदे यांच्या मनात १७७६ साली राहुरीकर तनपुरे पाटील यांच्या कन्येशी लग्न करण्याचे ठरले. तनपुरे घरंदाज पाटील होते, तनपुरे यास याचा सुगावा लागताच, त्यांनी आपली मुलगी पळवून दुसऱ्याा स्थळी नेऊन ठेवली. तेंव्हा महादजी शिंद्यांनी पाटलाच्या घरी चौकी बसविली. पाटलांकडे महादजीतर्फे रोज सरदार येत ते ठरवा, म्हणून पाटलाला सांगत, याचा शेवट काय झाला हे समजत नाही'[५]. परंतु यारून १८ व्या शतकात बळजबरीने विवाह केले जात असावे अथवा तसा प्रयत्न होत असावा. बळजबरी करणे, फसविणे हा एक गुन्ह्यााचाच प्रकार होता.

त्या काळात बहुपत्नीत्त्वाची चाल असल्यामुळे जबरदस्तीने मुली पळवून आणणे ज्यांना शक्य होत असे ते हे कर्म करीत असत.

'मुलगी पळवून नेऊन किंवा विकत घेऊन तिच्यावर पुरूष जबरदस्ती करीत असत. हे कर्म घडत असतानाच समाजात मुलीचे पैसे जास्तीत जास्त कसे मिळतील हे पाहणारेही लोक होतच. सन १६७०-१६७१ मध्ये भिऊबाई व्यास या ब्राम्हण स्त्रीने आपल्या मुलीचे दोनदा लग्न लावले'[६]. हा एक प्रकारे गुन्हाच ठरला होता, ही गोष्ट पेशवे सरकारच्या नजरेस आल्यावर त्यांनी मुलीची आई, मुलगी व तिचा भाऊ या सर्वांना शिवनेरीच्या किल्ल्यात कैदेत ठेवले होते.

ही सगळी फसवाफसवी जशी ब्राम्हणात होत होती, तशीच फसवाफसवी करून मुलीचे लग्न लावून देण्याचे प्रकार इतर समाजाही घडत होते.

वाङ्निश्चय एकाशी व विवाह दुसऱ्याशीच असाही प्रकार या काळात घडत असे. अशीच एक तक्रार पेशव्यांकडे आली होती. 'सन १६४४-१६४५, बोहर मेहर रघवंशी कोल्हापूरयाने आपली कन्या माझा पुत्र माधवसिंग यासी द्यावी हा विचार करून सोयरीक मान्य केली. अनुकुलता करून लग्न करावे तव कसबा मंगळूर पिराचे येथे लछीराम सोहोडिया रघवंशी राजपुत राहतो. त्याने बळेच लग्न करून घेऊन गेला. आपले जातीमध्ये सोयरिकीचा निश्चय झाला असता दुसरी सोयरीक करीत नाहीत. लछीरामाने आपणावरी जोरावरी केला आहे'[७].

या तक्रारीची दखल पेशव्यांनी घेऊन 'लछीराम यास ताकीद देऊन सुखानंद याच्या पुत्रास दुसरी सोयरीक करून लग्न करून देणे' अशी कमाविसदारास आज्ञा केली.

अशा प्रकारचे लग्नाच्या संदर्भात फसवणुकीचे एक प्रकरण माळी जातीतही आढळून आले. १७५२ मध्ये 'बापूजी माळी यांच्या मुलीचा पाट निंबाजी वल्लद येसू झागडा याच्याशी, परंतु निंबाजीने पाट लावण्यापूर्वी तिचा पहिला नवरा धोंडजी जीवंत आहे की मेला याचा तपास केला नाही. त्या अपराधाबद्दल निंबाजीला ८० रूपये दंड करण्यात आला'[८].

मुली पळवून नेणे, पैशांच्या लोभाने एकाच मुलीचे दोनदा लग्न लावणे. एका पुरूषाने अनेक लग्न करणे, अशा तऱ्हेचे नैतिक अधःपात ब्राम्हण, मराठा व इतरही समाजात घडत असत, त्यात स्त्रियांचीच होरपळ होत असे. त्यावेळी मुलीच्या भावना विचारच केला जात असे. काही वेळा तर मुली एवढ्याा लहान असत की त्यांना लग्न म्हणजे काय हे ही समजत नसे, असेच एक उदाहरण पहावयास मिळते.

आपल्याला हवी असलेली मुलगी पळवून नेऊन गुप्तपणे तिच्याशी लग्न लावीत, या धर्तीचे एक लग्न वाघोळी प्रांती वाई येथे घडले. जानो माणकेश्वर कुलकर्णी यांची ५ वर्षाची मुलगी जेवावयास नेतो म्हणून सिध्दनाथ मेढेकर याने रानात रमेश्वराच्या देवळात नेले. मुलीच्या बापाला ही बातमी कळली व धावत तो देवळात गेला पण यापूर्वीच लग्न पार पडले होते. महाबळेश्वरकर भटाला जानोजीने वाईस नेऊन तेथील ब्राम्हणासमोर उभे केले. त्यांनी भटावर दोष ठेवून त्याजपासून दंड घेतला व मुलीचे लग्न दुसऱ्याा वराशी करण्याची परवानगी दिली. क्षेत्रस्थ ब्राम्हणांचे हे पत्र घेऊन कुलकर्णी पुण्यास पेशव्यांकडे गेला. त्यांनी महारजी मेढेकर याजपासून यजीद (सोडचिठ्ठी) घेतले व कुळकर्ण्यास मुलीचे लग्न दुसऱ्याा वराशी लावण्यास परवानगी दिली. पेशवे दप्तर क्रमांक ४३ मध्ये लग्नविषयक असेच दुसरे एक प्रकरण आढळते, त्यातही पेशव्यांनी अशाच तऱ्हेची परवानगी दिली होती[९].

मोगलाईत म्हणजे मराठवाड्यातही असे लग्नाच्या बाबतीत फसवणुकीचे प्रकार घडत होते.

सदाशिव नागनाथ नावाचे एक गृहस्थ सिहस्थासाठी गोदा तिरी गेले असता घरी त्यांची पत्नी व लग्नाच्या मुली दोघीच होत्या. त्याच गावात फेसो बाबाजी कुळकर्णी याने शेषभट उपाध्ये व विठ्ठलभट जोशी यांच्या मदतीने मुलीस पाटलाच्या वाड्यात नेले. या सर्वांनी मिळून मंगलाष्टके म्हटली, मुलीच्या गळ्यात मंगळसूत्र घातले, हे एक प्रकारे फसवून, पळवून लग्न केल्याचाच प्रकार होय.

मुलीचा बाप तीर्थयात्रेहून परत आल्यावर त्यास हे माहित होताच त्याने पेशव्याकडे याबाबत तक्रार केली. सदाशिव नागनाथ याने बाबाजीस अटक करविली. ४५ ब्राम्हणांच्या सह्या घेऊन विधीपूर्वक झाले नसल्याचे पत्र सरकारात गुदरले. बाबाजीचे लग्न विधीपूर्वक झाल्याचे म्हटले. प्रकरण पेशव्यांनी गावाकडे

चौकशीसाठी पाठविले, चौकशीअंती हे लग्न अल्पवयीन नाशाबीद ठरवून सदाशिव नागनाथ यास मुलीचे लग्न दुसऱ्याा वराशी लावण्यास परवानगी दिली[१०].

औरंगाबादजवळ कन्नड परगण्यात जैतापूर गावी अशीच एक घटना घडली. श्यामजीची मुलगी आपल्या मुलास करावी, असा सदाशिव बामणीकर यांचा विचार होता. परंतु जगन्नाथ आपली मुलगी देण्यास तयार नव्हता, शेवटी सदाशिवने त्याची मुलगी पळवून तिचे लग्न आपल्या मुलाशी लावले. हा अपराध पेशव्यांच्या कानी जाताच त्यांनी त्या अपराधाबद्दल सदाशिव गबाजीचे ५ गावाचे कुळकर्णी पद रद्द केले[११].

निंबा पाठाराने आपली मुलगी भिकाजी जाधव याच्या मुलास दिली. त्यांचे लग्न होऊन पाच वर्षे झाली. भिकाजी जाधव यांचे कूल उत्तम नाही म्हणोन निंबाजी पाठारा याचे बायकोनी वेदमूर्ती वीरेस्वरभट याजजवळ फिर्याद दिली. मुलीची काडी मोडून भटजी मागतात, भिकाजी जाधव काडी मोडून देत नाही, म्हणून चिमाजी आप्पाकडे फिर्याद गुजरण्यात आली[१२].

कोणी सिवाजी नामक गृहस्थाने आपण कुणबी आहे असे सांगून आपल्यास मुलीस पाट लावून दिले, परंतु हा सिवाजी कोष्टी जातीचा निघाला. सिवाजी म्हणतो पाट लावताना आपण कोष्टी असल्याचेच सांगितले[१३].

अशा प्रकारे १८ व्या शतकातील समाज जीवनात जातीसंस्थेचे विवाह कुटुंब संस्थेचे पालन हे धार्मिक नियमाने होत असे. लग्नविधी हा एक धार्मिक संस्कार मानला जात असे. विधीवत व जाती-जातीतील लग्नासच समाज व पेशवे मान्यता देत असत. या नियमाच्या पलीकडे जाऊन काही गैरवर्तन घडल्यास त्यास शासन करण्यात येत असे.

काही विवाह प्रसंगी मुलीस पळवून नेऊन लग्न लावणे, म्हणजेच मुलीचे अपहरण करणे. खोटी जात सांगून लग्न लावणे, दोनदा लग्न लावून देणे, कन्याविक्रय इत्यादी प्रकारचे गुन्हे घडल्यास पेशवे अशा गुन्ह्याांची चौकशी करून त्यास दंड सुनावीत असत. परंतु या सर्व प्रक्रियेत स्त्रियांवर होत असलेल्या अन्यायाच्या बाबत पेशवे अथवा गोतसभा यांनी कोणत्याही प्रकारच्या सहानुभूतीचा विचार केल्याचे दिसत नाही.

**पेशवेकालीन स्त्रीवर होणारे अत्याचार :-**

१८ व्या शतकातील पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रीची किंमत काडीइतकी ही नव्हती. अगदी बालपणापासून तिच्यावर शारीरिक अत्याचार केले जात असत. बालविवाहाच्या रूढीने तर तिच्यावर सतत बलात्कारच होत असे. ती शारीरिक संबंधास सक्षम आहे की नाही हे ही पाहिले जात नसे. मुलगी ऋतुशांती करण्यासाठी सज्ज असे. यासाठी तो लगेच धर्माचा आधार घेण्यास तयार असे. धर्म काय सांगतो तर मुलगी किती लहान आहे हे महत्त्वाचे नसून तिला ऋतुप्राप्त होताच ती संभोगास पात्र ठरते, खरे तर हा अशा अजान मुलीवर अत्याचारच असे. परंतु या घटना १८ व्या शतकात धर्ममान्य, समाजमान्य होत्या व त्यात अनेक कोवळ्याा मुलींचा बळी जात असे, एक प्रकारे हा बलात्कारच असे, परंतु पेशवे सरकार यास गुन्हा मानत नव्हते.

इतर बाबतीत स्त्रीवर कोणी पतीशिवाय बलात्कार केला तर तो मात्र गुन्हा मानला जात असे.

उदा. 'रयेच्या बायेका तुलसी सेटीच्या कारकुनानी धरून नेऊन बळेच जुलुम केला'. 'ब्राम्हणाची विधवा स्त्री जुलमाने धरून नेऊन बलात्कार केला'[१४].

'छोटा कासी माली मजकुर याणे कासीदा माली याचे बाईकोस जबरदस्तीने धरून बदअमल केला आणि पलोन गेला'[१५].

असे बदकर्माचे, बलात्काराचे गुन्हे समाजात घडत होते. या बदकर्माचे स्वरूपही भिन्न भिन्न मानण्यात येत असे. एकांतात स्त्रीशी बोलणे, तिला भेट वस्तू देणे, अयोग्य ठिकाणी स्तन, कटी, योनी यास स्पर्श करणे, संभोग करणे हे सर्व गुन्हे बदकर्मात मोडत असते. खालच्या जातीच्या लोकांना उच्चवर्णीयांच्या स्त्रियांबरोबर बोलण्यास बंदी असे, असे बोलताना आढळल्यास तो गुन्हा ठरत असे.

जर एकांतात गुलाम असलेल्या स्त्रीबरोबर स्वैराचारिणी स्त्री बरोबर बोलत असल्यास तो गुन्हा ठरत असे. निकृष्ट जातीचा पुरूष उत्कृष्ट जातीच्या स्त्रीबरोबर गमन करेल तर तो ही शिक्षेस पात्र ठरत असे. हे प्राचीन नियम अठराव्या शतकातही पाळले जात असे.

१८ व्या शतकात बदकर्माची अनेक उदाहरणे पाहावयास मिळतात.

'काशी कोम त्रिंबकजी चवान वस्ती, कसबे नेवासे इने आपला दादला व घरदार सोडून पुण्यात येऊन बदकमी करीत होती'[१७].

'सई देशमुखीन चिकोडीकर हिनं मद्यपान करून बाबजी हरि जोगळेकर यासी बदकर्म केले'[१८].

'उधो वरेश्वर तालुका शिवनेर यास सनद की, रूकमी जाती मात्र ब्राम्हण स्त्री हिला शूद्र व ब्राम्हण यासी व्यभिचार घडोन भोजनाविक शूद्रासी व्यवहार घडला'[१६].

'गिरजी ब्राम्हणी बायको रणे सुलताना सिकलगार यवन यासी बदकर्म केले'[२०].

'सूर्यनारायण आणि तेंग याने राही ब्राम्हण इजपाशी पेशजी बदकर्म केले त्याचा मुद्दा खरा जाला'[२१].

बाबाजी गुरवाचा मुलगा बहिरजी याने महाराणीशी बदमल केला. इतकेच काय ? पण तो तिला घेऊनही राहिला. बाबाजीने बहिरजीच्या वर्तनाकडे कानाडोळा केला. सबब बाबाजी मनकुरास गावाने कुटुंबासह वर्तमान वाळीत घातला होता पण त्या कुटुंबाने वाळीत तरी किती दिवस राहावयाचे ? वाळीत पडण्याने सदर कुटुंब स्वजातीस अंतरले होते व महारात जाऊ पडण्याचीही त्यांची तयारी नव्हती. अशा स्थितीत ही भानगड मिटविण्यास गोतच समर्थ गोताच्या पंचायतीत त्याला जातीत घेण्याचे ठरले व त्या निवाड्याास सरकारची मंजूरी ही मिळाली. मात्र त्याबद्दल बाबाजीस सरकारात ५० रूपये शेरणी (दंड) भरावा लागला[२२]. (पे. डा.)

अशा प्रकारे व्यभिचाराच्या खटल्याचा निवाडा तारतम्याने केला जाई. अशाच प्रकारे १७५४ साली एका कोळणीवर बदकर्माचा आरोप आला. तिला सदर अपराधाबद्दल बटीक होण्याची पाळी यावयाची. पण तिच्या जातीच्या लोकांनी तिच्या बाजूने रदबदली केल्यावरून ५० रूपये दंड घेऊन बटीकपणापासून सरकारने तिला मुक्त केले[२३].

सन १७८५-१७८६ मध्ये मावळ तालुक्यातील विसापूरच्या किल्ल्यात जानकी नामक स्त्री व्यभिचारावरून कैदेत होती[२४]. तिची वर्तणुक पुढे चांगली राहिल याविषयी तिचा बाप जामीन राहिल्यामुळे तिची मुक्तता झाली.

घोलवड प्रांत जुन्नर येथील अहिली कोम जानोजी हिने देवजी खंडोजी राहणार चिंचवड याजबरोबर बदकर्म केले. बदकर्माबाबत स्त्रियांना कडक शिक्षा केल्या जात. अहिलीचे नाक कापून तिला कुरूप करण्यामागे बदकर्माबाबत इतर स्त्रियांवर वचक बसवा आणि अहिलीकडे पाहण्याची कोणाचीही वासना होणार नाही, अशी या शिक्षेमागे भावना होती[२५].

काही विधवा स्त्रियांकडून अशा प्रकारचे बदकर्म घडत असे. विधवा स्त्रियांना केशवपन करण्यासाठी नाव्हयााापुढे बसावे लागत असे. काही स्त्रियांना ही संन्यास दीक्षा बळजबरीने देण्यात येत असे. अशा काही स्त्रिया नटण्या-मुरडण्याची हौस व पतीसुखाची आवड पुरी न झाल्यामुळे पापकर्मास प्रवृत्त होत असत.

राजाराम भट बिन सदाशिव भट ब्राम्हण गोदावरी वरील श्रीक्षेत्र पुणतांबे येथील रहीवासी तो मृत्यू पावला. तेंव्हा त्याची स्त्री जान्हवीबाई हिचे क्षौर करण्यात आले. पुढे ती बाई अंताजी मुकुंद गोळक राजेवाडीवर याजपाशी राहिली. तिचे व त्याचे प्रेम जमल्यावर तिला केस वाढविण्याची व काकणे घालण्याची आवड उत्पन्न झाली. त्याप्रमाणे तिने केल्यावर तिला गोळकापासून पुत्र झाला. तो सात-आठ वर्षाचा असता तो बदकर्म सरकारास कळल्यावर जान्हवी व तिचा पोरगा यांना किल्ले पुरंदरास अटकेत ठेवण्यात आले. त्याजपासून चुना वाटवून घ्यावा व त्यांचा पोटास रोज द्यावा, अशी त्यास सक्त मजूरीची शिक्षा देण्यात आली[२६].

गरती स्त्रियांकडून व्यभिचार होऊ नये यावर समाजाची व सरकारची करडी नजर असे. तसेच एखाद्या स्त्रीवर बदकर्माचा आरोप झाल्यास तिला सरकारमार्फत 'कुणबीन' केले जाई, ही एक प्रकारे बदकर्म करणाच्याा स्त्रीस फार मोठी शिक्षा असे.

धारवाडच्या एका ऐतिहासिक कागदात म्हटले आहे की, 'शूद्र वगैरे नीच जातीची स्त्री छिनाल्यास सापडली असता तिच्या भ्रतारास आगर तिजला दंड द्यावयास सामर्थ्य नसल्यास, विशेष प्रसिध्दीच्या गृहस्ताची नसल्यास, क्वचित कोठे एखादा मक्तेचा मामलदार कुणबीन करून कोठीत ठेवून कोणास देत होता अथवा विकीत होता, यास शास्त्र नाही. जुलमाने कुणबीन करितात. शास्त्रात कुणबीन करावी असे नाही. काही दंड काही प्रायश्चित्त असे आहे त्यात दंडायौवनी कुणबीन करतात जुलमाने'[२७].

या पत्रावरून त्या काळात छिनाल स्त्रियांना कुणबीन करणे शास्त्रसंमत नसले तरी समाजसंमत होते असे दिसते.

एखाद्या प्रतिष्ठित घराण्यातील स्त्री संदर्भात असा गुन्हा घडल्यास सरकार गुन्हेगारी (दंड) म्हणून जबर रक्कम घेऊन प्रकरण मिटवित असे. याबाबत पेशवे रोजनिशीत एक नोंद आढळते, ती अशी -

"अंदाई पाटलीण मौजे वडगांव कार्यात निंबसोड माईणी हिने झगडपुरी गोसावी वस्ती पुसेसावळी यासी बदमल करणे. याकरीता हरदुजणांस हुजूर आणविली होती. त्यास बाळंभट वस्ती वडगांव निसबत महादेव गोसावी यांनी हुजूर घेऊन, हरदुजणांविशी विनंती अन्याय माफ करावयाविषयी करून हरजुणांकडे गुन्हेगारी करार रूपये ७ हजार यमाजी शिवदेव याचे मार्फतीने करार करून हरदुजणांचे नावे अभयपत्रे की, सदरहु

ऐवजाचा वसूल सरकारात देऊन पावली याचा जाब घेऊन सुखरूप राहणे. कोणेविशी ज्याजती उपसर्ग लागणार नाही म्हणून अभयपत्र”.

१. अंदाई घारगी पाटलीन मौजे वडगांव
२. झागडपुरी गोसावी मौजे पुसे सावली[२८].
सदरील ऐवजाचा हवाला यमाजी शिवदेव यांचकडे मुदत[२९].

अशा प्रकारे १८ व्या शतकात स्त्रियांवर मोठ्याा प्रमाणावर अत्याचार करण्यात येत होते. बलात्कार, बदकर्माच्या बाबतीत पुरूषाऐवजी स्त्रियांनाच कडक शासन करण्यात येत होते, एक प्रकारे स्त्रियांवर फार मोठा अन्यायच होत होता. त्यामुळे बलात्कार झालेल्या स्त्रीच्या आई-वडीलांचा बलात्कार लपविण्यामागेच जास्त कल दिसतो. कारण बलात्कार करणाऱ्याा व्यक्तीपेक्षा जिच्यावर तो होतो त्या स्त्रीला बलात्काराची झालेली घटना लांच्छनास्पद आहे असे समाज मानतो. तिचे लग्न ठरणे कठीण जाते, अब्रुचे धिंडवडे उडू नये म्हणून असे गुन्हे लपविण्यामागेच जास्त मानसिकता दिसते.

या प्रमाणेच विविध कारणांनी स्त्रियांवर अत्याचार होत असे, अशा अत्याचाराच्या काही घटना ऐतिहासिक कागदपत्रातून पहावयास मिळतात. या अत्याचारात सासुरवास सहन करणाऱ्याा अनेक स्त्रिया असत, सासुरवास सहन करणाऱ्याा स्त्रियांकडे मायेने पाहणारेही कोणी नसे.
या सासुरवासात सुनेला डागायचे, तिचे हालहाल करावयाचे, तिला पेटवून देऊन जीवंत जाळायचे किंवा विहिरीत ढकलून द्यावयाचे अशी उदाहरणे त्या काळात घडत असत.

असे अत्याचार त्या काळात घडत असत, असे अत्याचाराचे जीवन जगतच त्यांना मरण जवळ धरावे लागत असत. कारण लग्न झाल्यावर स्त्री ही पूर्णतः पुरूषाच्या मालकीची होई. त्यावर त्याने अशा स्त्रीला मारहाण केली, छळ केला तरी तिला काडीमोड घेत येत नसे, बहुतेक ही रूढी अस्तित्त्वात होती[३०].
मनुने तर स्त्रीला शिक्षा करण्याचा अधिकारच पतीला दिला आहे, त्या अधिकारातच पती पत्नीचा वाट्टेल तसा छळ करीत असत. परंतु समाज अथवा सरकार अशा पतीला कोणतेही शासन करीत नसत असे दिसते.

**विवाहबाह्या संबंधाचे गुन्हे :-**

१८ व्या शतकातील स्त्रीवर होणारे अन्याय, अत्याचार, बलात्कार, बदकर्म आदीबाबत पुष्कळ माहिती ऐतिहासिक कागदपत्रातून मिळते. त्याचप्रमाणे पुरूषांच्या विवाहबाह्या संबंधावरही प्रकाश टाकणारी बरीच ऐतिहासिक कागदपत्रे उपलब्ध आहेत. विवाहबाह्या संबंधाचे गुन्हे हे एक प्रकारे बदकर्माचेच गुन्हे ठरत असत. या काळात सहवासासाठी स्त्रिया उपलब्ध होत होत्या, इतकेच नव्हे तर त्यांचे दानही करता येत असे. राजकीय, धार्मिक, न्यायविषयक, जातीविषयक कारभार पाहणारी गोतसभाही लोकांची अथवा जानपद्दीय संस्था निर्माण झाली. राजकीय विभागानुरूप गोतसभेचे घटक बदल. गोतसभेशिवाय ब्रम्हसभा, जातीसभा अशा दोन लोकरूढ न्यायसंस्था होय. ब्राम्हसभाही प्रसिध्द क्षेत्रांच्या ठिकाणी असे. तेथील विद्वान ब्राम्हणांचा तीमध्ये समावेश असे. धर्माधिकारी हा तिचा प्रमुख असे. राजमंडळाचा पंडितराव धर्मविषयक वाद-विवादाचे संचालन करण्याचे कार्य या ब्राम्हसभामार्फत करी. जातीच्या अचारादी पंरपरासंबंधी या सभेचे निर्णय श्रेष्ठ व अखेरचे मानले जात. तसेच व्यवहार विषयक वादात स्मृत्यादिमधून ग्रंथीत केलेल्या परंपरांच्या निर्णयाबाबत ही सभा श्रेष्ठ होती[३१].

लोकरूढ न्यायसंस्थाच न्यायनिर्णय करीत, सरकारी अधिकाऱ्याांचे काम फक्त त्याची अंमलबजावणी करण्याचे असे. वादी आपल्या इच्छेनुसार गाव, तर्फ अथवा सुभ्याच्या मजलक्षीपुढे आपली तकरीर सादर करीत. अमुकच ठिकाणी त्याने प्रथम तक्रार करावी असा नियम नव्हता. सरकारी अधिकारी तक्रारीची नोंद करीत. नंतर देशकांच्या मदतीने गोतसभा बोलावण्यात येई. स्थानिक देवालयापुढील वडाच्या अथवा पिंपळावरच्या पारावर सभा करत असे.

तीन प्रकारचा पुरावा सामान्यतः स्वीकारी. कागदपत्र भोगवटा व साक्षी अथवा गोटी यातून कोणताच पुरावा पुढे न आल्यास दिव्यावरून निर्णय घेण्यात येत असे[३२].

निर्णयाची अंमलबजावणी करताना सरकारी अधिकारी उभयवाद्यांकडून हरकी व गुन्हेगारी ऐपतीप्रमाणे वसूल करीत. पोताना श्रमाबद्दल मोबदला म्हणून जेवण व वस्त्र मिळत असे, देशमुख-पाटलांना शेला पागोटे देत[३३].

अपराध्यांना पुढील प्रमाणे दंड करण्यात येत असे. (१) राजदंड अथवा दिवाणदंड, (२) देवदंड, (३) जातीदंड, सरकारी शिक्षेस राजदंड किंवा दिवाणदंड म्हणत. धार्मिक व आत्मिक दोष परिमार्जनास देवदंड म्हणत व जातीदंडही एक प्रकारची सामाजिक शिक्षा होती. दिवाणदंडाची अंमलबजावणी सरकारी अधिकारी करीत व दुसऱ्याा दोन दंडाची अंमलबजावणी ब्रम्हसभा व जातीसभा करीत असत.

गुन्हेगारास सरकार द्रव्यदंडाची अथवा कारावासाची योग्य शिक्षा देत असे. तो शिक्षा भोगल्यावर तो अपराधी क्षेत्राच्या ब्रम्हसभेकडे जाई व ब्रम्हसभेस शुध्दीकरणविषयक विनंती करणारे दिवाणाचे पत्र सादर करे. तेथे त्यास प्रायश्चित्त सांगितले जाई. प्रायश्चित्त घेतल्यानंतर ब्रम्हसभेचे शुध्दीपत्र घेऊन ते जातीसभेपुढे जाई. तेथे त्यास जाती व्यवहारास पात्र होण्यासाठी त्यास जातीस भोजन द्यावे लागे, त्यास पंक्तीपावनत्त्व अथवा गोताई म्हणत[३४].

अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांनी जी न्यायपध्दती आपल्या राज्यात सुरू केली होती. तीच १८ व्या शतकात पेशव्यांनी पुढे चालू ठेवली होती. या काळात न्यायाची मुख्य सूत्रे न्यायाधिशच्या हाती असत, हे न्यायाधिश शास्त्री असल्यामुळे त्यांनी मनु, याज्ञवल्क्य, नारद, विष्णु, बृहस्पती, कौटिल्य इत्यादींच्या ग्रंथांच्या अध्ययनातून कोणत्या गुन्ह्यास धर्मशास्त्राने कोणत्या शिक्षा वा प्रायश्चित्त सांगितले आहे हे पाहून न्याय देत असत, याचाच अर्थ संपूर्ण न्यायव्यवस्था धर्ममूलक होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात न्यायखात्याचे प्रमुखत्त्व छत्रपतींच्या अष्टप्रधानांपैकी पंडितरावाकडे असे. परंतु पुढे पेशवाईत त्या कामाकरीता न्यायाधिश नेमण्यात आले. पेशवाईतील रामशास्त्री प्रभुणे हे न्यायाधिश प्रसिध्द आहेत. ते बाळाजी बाजीराव पेशवे यांच्या कारकिर्दीत प्रसिध्दीस आले होते, त्यांनीच त्यांची १७५१ मध्ये शास्त्री मंडळीत नेमणूक केली होती.

रामशास्त्री प्रभुणे यांच्या मृत्यूनंतर अय्याशास्त्री यांच्याकडे न्यायाधिश पदाचा कारभार सोपविण्यात आला होता. हे न्यायाधिशही धर्मशास्त्राप्रमाणेच निर्णय देत असत. ‘व्यवहार मयूख’ यासारख्या ग्रंथास अनुसरून खटले चालवित. याज्ञवल्क्य म्हणतो, ‘राजाने स्वतः न्याय द्यावा पण राज्यकारभारापुढे न्याय देण्यास राजाला फुरसत नसेल तर त्याने धर्मशास्त्र जाणणारा न्यायाधिश नेमावा. त्याच्या मदतीला पंच असावेत, धर्मज्ञ वेदज्ञ व सत्यवादी नेमण्यात यावे. अशा पंचाच्या सहाय्याने न्यायाधिशाने न्याय द्यावा, राजाने त्यास अनुसरून अपराध्याला शासन करावे’[३५]. पेशवाईत शक्य तितका याच पध्दतीने न्यायदान करण्यात येत होते, असे ऐतिहासिक कागदपत्रावरून दिसून येते.

रामशास्त्री यांचे कारकिर्दीत त्यांच्या हाताखाली अमीन व दफ्तरदार हे अधिकारी होते. फिर्यादीची अर्जी व प्रतिवादीची जबानी ज्याची त्यांनी लिहून आणावी ती अमीन यांनी पाहून दफ्तरदार यांचे हवाली करावी. दफ्तरदारांनी ती अर्जी पाहून प्रतिवादी यास पुसावयाचे सवाल निवडून काढावे. त्याचे जाब लिहून घ्यावे व साधनांचे (पुराव्याचे) कागदपत्र वादी-प्रतिवादी यांचे असतील ते अमीन याने पाहून त्यांच्या नकली दप्तरी ठेवाव्या. त्या पुराव्याची चौकी दफ्तरदार व अमीन यांनी करावी[३६].

गुन्ह्याची चौकशीचे व गुन्हेगारास शिक्षा करण्याचे काम पाटील, मामलेदार वगैरेकडे असे पण अमूक गुन्ह्यास अमूकच शिक्षा द्यावी असा कायदा नसल्यामुळे अंमलदारास गुन्हा कमी अगर जास्त महत्त्वाचा वाटेल, त्याप्रमाणे तो शिक्षा करी, त्या त्या ठिकाणचा रिवाज हाच काय तो सरकारी अधिकाऱ्यांस आधार, देहान्त शिक्षा देणे झाल्यास मात्र नाना फडणविसांची व पुढे पुढे पेशव्यांचा परवानगी लागे. पण भिल्ल, मांग, रामोशी वगैरे जातींच्या गुजन्ह्यासंबंधाने या परवानगीची जरूर नसे. मामलेदार त्या लोकांस धरून नुसत्या संशयावरून त्यांना क्रूर शिक्षा देत असत.

सरकारच्या विरूध्द ज्याने फंद फितूर केला असेल त्यास मात्र देहांत शिक्षा देण्यात येई. ज्यांनी खून केला आहे अशापैकी पुष्कळ असामी सरकारास दंड देऊन व ज्याचा खून केलेला असेल त्याचे कुटुंबातील माणसांत नुकसानी दाखल द्रव्य देऊन मोकळे होत[३७].

**संदर्भ ग्रंथ**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | डॉ. देशमुख शारदा | : | ‘शिवकालातील व पेशवाईतील स्त्री जीवन’, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, प्र. आ. १९७३, पृ. क्र. २२३. |
| २ | भावे वा. कृ. | : | ‘पेशवेकालीन महाराष्ट्र’, भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, प्र. आ. १९७६, पृ. क्र. ३८२. |
| ३ | तत्रैव | : | पृ. क्र. ३८५. |
| ४ | तत्रैव | : | पृ. क्र. ३८५. |
| ५ | भावे वा. कृ. | : | ‘पेशवेकालीन महाराष्ट्र’, पृ. क्र. २८७. |
| ६ | गोगटे चि. ग. | : | ‘बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची रोजनिशी’ भाग-२, प्र. आ. १९८८, पृ. क्र. २२०, २२१. |
| ७ | तत्रैव | : | पृ. क्र. २२०, २२१. |
| ८ | भावे वा. कृ. | : | ‘पेशवेकालीन महाराष्ट्र’, पृ. क्र. २८८. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | देशमुख शारदा | : | ‘शिवकाळातील व पेशवे काळातील स्त्री जीवन’, पृ. क्र. ८५. |
| १० | तत्रैव | : | उपरोक्त पृ. क्र. ८६. |
| ११ | भावे वा. कृ. | : | ‘पेशवेकालीन महाराष्ट्र’, पृ. क्र. २९४, २९५. |
| १२ | सरदेसाई गो. स. | : | ‘पेशवे दप्तर’, खंड–४३, पृ. क्र. ३. |
| १३ | तत्रैव | : | पृ. क्र. १२. |
| १४ | तत्रैव | : | पृ. क्र. १४७. |
| १५ | श्रेव्ड | : | च्ंहम ३६७ |
| १६ | तत्रैव | : | पृ. क्र. ३६६. |
| १७ | सरदेसाई गो. स. | : | ‘पेशवे दप्तर’, खंड–८, पृ. क्र. १९. |
| १८ | तत्रैव | : | ‘पेशवे दप्तर’, खंड–७, पृ. क्र. २१०. |
| १९ | तत्रैव | : | ‘पेशवे दप्तर’, खंड–७, पृ. क्र. २१०. |
| २० | तत्रैव | : | ‘पेशवे दप्तर’, खंड–४३, पृ. क्र. १५४. |
| २१ | तत्रैव | : | ‘पेशवे दप्तर’, खंड–३२, पृ. क्र. १२५, १२६. |
| २२ | भावे वा. कृ. | : | ‘पेशवेकालीन महाराष्ट्र’, पृ. क्र. २३१. |
| २३ | तत्रैव | : | पृ. क्र. २३१. |
| २४ | तत्रैव | : | पृ. क्र. २३१. |
| २५ | तत्रैव | : | पृ. क्र. २३२. |
| २६ | तत्रैव | : | पृ. क्र. २३२. |
| २७ | डॉ. पवार जयसिंगराव | : | ‘मराठीचे अंतरंग’, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली (पू.) प्र. आ. २००६, पृ. क्र. ८४. |
| २८ | तत्रैव | : | पृ. क्र. ८४. |
| २९ | तत्रैव | : | पृ. क्र. ८४. |
| ३० | तत्रैव | : | पृ. क्र. ९०. |
| ३१ | कुळकर्णी अ. रा. आणि खरे ग. ह. | : | ‘मराठ्यांचा इतिहास’, खंड १ ला कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९४, पृ. क्र. २६०, २६१. |
| ३२ | तत्रैव | : | पृ. क्र. २६१. |
| ३३ | तत्रैव | : | पृ. क्र. २६२. |
| ३४ | तत्रैव | : | पृ. क्र. २६२. |
| ३५ | भावे वा. कृ. | : | ‘पेशवेकालीन महाराष्ट्र’, पृ. क्र. ३७६. |
| ३६ | तत्रैव | : | पृ. क्र. ३७७. |
| ३७ | तत्रैव | : | पृ. क्र. ३८०. |